॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.17 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने सहकार महर्षि स्वा.भाऊसो.प्रल्हादराव पाटील व्याख्यानमालेतंर्गत उदया मंगळवार, दि.18 सप्टेंबर रोजी सामाजिक कार्यकर्त्या गुंजन गोळे-तळेगावकर (अमरावती) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

चेअरमन, श्री.संत मुक्ताबाई इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, जळगाव यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. उदया मंगळवारी सायंकाळी 6 वाजता वाजता मुलींचे वसतिगृह क्र.1, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे गुंजन गोळे-तळेगावकर हे ‘ स्त्रियांचे सामाजिक भान’ या विषयावर व्याख्यान देणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषद सदस्य, दिलीप रामू पाटील राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी केले आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. 17 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात इरॅस्मस प्लस प्रकल्पांतर्गत विद्यापीठातील विविध प्रशाळांच्या प्राध्यापकांचे दोन दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून आज दि.17 सप्टेंबर रोजी या प्रशिक्षणास सुरुवात झाली.

या प्रशिक्षणाचा विषय `वैयक्तिक विकास व बौध्दिक प्रामाणिकता ` असा असून या प्रशिक्षणासाठी पोर्तूगाल, लिस्बन येथील प्रा.जोंऊ सेव्हिलहानो विद्यापीठात दाखल झाले आहेत. या प्रशिक्षणात प्रामुख्याने गटचर्चा, एकत्रित काम याद्वारे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याचा वैयक्तिक विचार लक्षात घेवून समुहाचे एकत्रित सर्वमान्य विचार कसा तयार होऊ शकतो यावर प्रामुख्याने भर दिला जाणार आहे, असे प्रशिक्षक प्रा.सेव्हिलहानो यांनी उद्घाटनाप्रसंगी सांगितले.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी याप्रसंगी अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचे महत्व विशद केले. विद्यापीठ कॅम्पसवरील तसेच महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या प्रशिक्षणासाठी सदैव असे प्रयोग करणार असून यामुळे फायदा होऊन विद्यापीठाचे मानांकन सुधारण्यास मदत होईल असेही ते म्हणाले. या प्रकल्पाचे समन्वयक प्रा.ए.एम.महाजन यांनी प्रकल्पाची पार्श्वभूमी विशद करुन सर्व प्रशिक्षणार्थ्यांकडून त्यांच्या असलेल्या अपेक्षा व्यक्त केल्या. प्रा.मधुलिका सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. डॉ.मनिष जोशी यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा.भूषण चौधरी, प्रा.अनिल डोंगरे हे विद्यापीठस्तरीय प्रशिक्षकही उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी प्रा.सोनवणे व प्रा.जोशी मुख्य प्रशिक्षकांचे सहप्रशिक्षक म्हणून काम करणार असून विद्यापीठ परिक्षेत्रातील 17 प्राध्यापक प्रशिक्षण घेत आहेत.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक :17 सप्टेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी